वाचले क्र.

१) जाहिरात क्र. ब-३, क्र.३३८ दि.२९/१०/२०१८ वायसीएमएच/७/कावि/६०३/२०१८ दि.२९/१०/२०१८
२) निवड समितीने शिफारस केलेली निवड व प्रतिक्षा यादी
३) नियुक्ती आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/१/२०१९ दिनांक०२/०१/२०१९
४) मा.आयुक्त यांचेकडील दि. ३१/०१/२०१९ रोजीचा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
क्र.वायसीएमएच/७/कावि/१४४/२०१९
दिनांक ०१/०२/२०१९

**विषय-** यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना विविध पदांवर नियुक्ती आदेश देणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये रूग्णाचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेले विविध ११पदे एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता भरणेकामी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये दैनिक वृत्तपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रकटन करणेत आले असता सदरचे विविध पदाकरीता आलेले सर्व उमेदवारांच्या लेखी परिक्षा दि.१३/११/२०१८,दि.१४/११/२०१८ व दि.१५/११/२०१८ रोजी घेण्यात आलेल्या आहेत. दक्षता विभागाने उत्तर पत्रिका तपासणी करून दिलेल्या गुणवत्तायादीनुसार वाचले क्र.२ अन्वये निवड समितीने गुणवत्ता व आरक्षणानुसार उमेदवारांची निवड व प्रतिक्षायादी तयार केलेली आहे. निवड समितीने प्रथम निवड केलेल्या विविध पदांवरील ९७ उमेदवारांना उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता नियुक्ती आदेश निर्गत करणेत आलेले आहेत. आदेशात नमुद केलेल्या विहित मुदतीत ९७ उमेदवारांपैकी ६१ उमेदवार रूजू झालेले असून उर्वरीत ३६ उमेदवार रूजू झालेले नाहीत. अशा रिक्त ३६ जागी उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये प्रतिक्षा यादीतील ३२ उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात आदेशाचे तारखेपासून नियुक्ती देणे आवश्यक आहे.

सबब निवड समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त वाचले क्र.२ मधील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांपैकी सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मधील ३२ उमेदवारांना एकत्रित मानधनावर आदेशाचे दिनांकापासून दि.०१/०२/२०१९ ते दि.०१/०७/२०१९ अखेर या कालावधीसाठी खालील अटी व शर्तीस अधीन राहून तात्पुरत्या/ हंगामी स्वरूपात नेमणुक देणेस मी, आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ या आदेशान्वये मंजुरी देत आहे. सदर मानधन कर्मचा-यांना देणेत येणारे एकत्रित मानधन हे सोबतचे प्रपत्र अ मध्ये त्यांच्या नावापुढे दर्शविण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती-**

1) नियुक्ती कालावधी संपुष्टांत आल्यानंतर सेवा समाप्तीबाबत स्वतंत्र आदेश निर्गत केले जाणार नाहीत. प्रस्तुतची मुदत संपल्यानंतर त्याचा या पदावरील नेमणुक संदर्भात कोणत्याही प्रकारचा हक्क व दावा राहणार नाही.
2) नेमणुक कालावधीत नियुक्ती अधिका-यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल. तसेच त्यांच्या सुचनांचे, निर्देशांचे वेळोवेळी पालन करावे लागेल. तसेच वेळोवेळी वरिष्ठा सागंतील ती कामे करावी लागतील.
3) नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी एक महिना आगाऊ विनंतीपत्र द्यावे लागेल. तसे आगाऊ पत्र न दिल्यास त्यांच्याकडून एक महिन्याचा मेहनताना वसुल करण्याचा अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील. याबाबत कोणतेही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
4) नियुक्ती कालावधीत विनापरवाना,विनासुचना गैरहजर राहिल्यास तसेच कामकाज असमाधानकारक असल्याचे निर्देशनास आल्यास नियुक्ती कालावधीच्या कोणत्याही स्तरावर त्यांची सेवा समाप्ती करणेचा अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहतील.
5) मानधनावरील कर्मचारी यांना सहा महिनेतून फक्त चार दिवस किरकोळ रजा देय राहील. व ही रजा किरकोळ रजा ज्या त्या महिन्यात घ्यावी लागेल. अशी रजा संचयीत करून एकत्रित रित्या घेता येणार नाही. मात्र अपावदात्मक परिस्थितीमध्ये अशा प्रकारे रजा देणेबाबत नियंत्रीत अधिकारी यांना शिफारस करता येईल. व त्यानुसार अन्य कारणास्तव गैरहजेरी विनावेतनी करणेत येईल. ही रजा पुढच्या महिनेत देणेबाबत विभागप्रमुखांना अधिकार राहतील.